I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल
**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S. (पोलीस ठाणे):** कराड शहर **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 1353 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/11/2025 22:38 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** शुक्रवार **Date from (दिनांक पासून):** 28/11/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 28/11/2025

**Time Period (कालावधी):** प्रहर ५ **Time From (वेळेपासून):** 12:31 तास **Time To (वेळेपर्यंत):** 12:44 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 28/11/2025 **Time (वेळ):** 20:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 051 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 28/11/2025 22:38 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** उत्तर, 5 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** यांत्रिकी व विद्युत पथक, टेंभु उपसा सिंचन व , ओगलेवाडी कराड ताकराड,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** सुनिल दाजी पाटील

**(b) Father's Name (चे नाव ):** दाजी पाटील

**(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1987 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h) Occupation (व्यवसाय):**

**(i) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रुम नंबर 13, रुद्रांश हाईट्स, , गोळीबार मैदान गोडोली, सातारा, कराड शहर, सातारा, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | रुम नंबर 13, रुद्रांश हाईट्स, , गोळीबार मैदान गोडोली, सातारा, कराड शहर, सातारा, महाराष्ट्र, भारत |

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-8308469377

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | आनंद रामदास काळमेघ | | वडील चे नाव : रामदास काळमेघ | 1. रुम नं 27,दुसरा मजला सिल्वर ओक,Town/Village (शहर / गाव): बिल्डींग SGM कॉलेज,Tehsil (तहसील): कराड,Police Station (पोलीस ठाणे): कराड शहर,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | माधुरी साई देवरे | | पालक चे नाव : साई देवरे | 1. सिल्वर गार्डन अपार्टमेंट,फ्लॅट नं एफ 9,Town/Village (शहर / गाव): बनवडी फाटा कराड,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): कराड शहर,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11.**

**I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)**

**Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|
| | |

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

खबरी जबाब दिनांक 28/11/2025

मी सुनिल दाजी पाटील वय 38 वर्षे, व्यवसाय - पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा रा. रुद्रांश हाईट्स, रुम नंबर 13, गोळीबार मैदान गोडोली, सातारा ता. जि.सातारा मुळ रा. मु. थावडे पो. सौंडोली, ता.शाहुवाडी जि.कोल्हापुर मोनं - 8308469377

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा येथे पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि.19/11/2025 रोजी श्री. राजेश वाघमारे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. सातारा यांनी आम्हास फोन वरुन कळविले की, तक्रारदार श्री शंकर आण्णा रास्कर रा.शिवाजीनगर, ता.कडेगाव जि.सांगली यांना शाखा अभियंता देवरे मॅडम सिक्युरीटी एजन्सीचे 4,66,960/- रुपयांचे बिल मंजुर केले म्हणुन मंजुर केलेल्या बिलाच्या तीन टक्के प्रमाणे 14,000/- रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रार फोनव्दारे कळविली असून सदर तक्रारदार संपर्क करतील त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करा असे आम्हास आदेशित केले.

दिनांक 19/11/2025 रोजी सकाळी 08.01 वा. तक्रारदार शंकर रास्कर यांनी त्यांचे मोबाईल फोन वरुन आम्हाला संपर्क केला. तेव्हा तक्रारदार यांनी टेंभु उपसा सिचंन योजना ओगलेवाडी कराड येथील शाखा अभियंता देवरे मॅडम सिक्युरीटी एजन्सीचे 4,66,960/- रुपयांचे बिल मंजुर केले म्हणुन मंजुर केलेल्या बिलाच्या तीन टक्के प्रमाणे 14,000/- रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रार सांगीतली व तक्रारीवर ओगलेवाडी ता.कराड जि.सातारा येथे येवुन कारवाई करणेबाबत विनंती केली. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना ओगलेवाडी, कराड येथील रेल्वे स्टेशन जवळ 10.00 वा. हजर राहण्यास सांगीतले. त्यानुसार जिल्हा परिषद शिक्षण विभाग सातारा येथील दोन शासकीय पंचांना पंच म्हणुन काम करणेसाठी उपस्थित राहणेबाबत सुचना दिल्या त्यानुसार पंच म्हणुन 1. शरद नारायण रोकडे, कनिष्ठ लिपीक, जिल्हा परिषद शिक्षण विभाग, सातारा 2. आनंद शामराव खैरमोडे, वरिष्ठ सहायक, जिल्हा परिषद शिक्षण विभाग, सातारा हे उपस्थित राहीले. दोन्ही पंचांना सापळा पथकाची ओळख करुन दिली तसेच तक्रारदार श्री. शंकर आण्णा रास्कर हे ओगलेवाडी ता.कराड येथील रेल्वे स्टेशन जवळ थांबलेले असुन तेथे जावुन सापळा कारवाई करणार असल्याचे दोन्ही पंचांना सांगितले. त्यानुसार सापळा पथकामध्ये पोहवा ताटे, राजपुरे, मपोना जाधव, मपोशि गुरव, पोशि थोरात, पोशि कणसे व शासकीय वाहन क्रमंाक एम एच 11 डी एच 8213 चालक पोहवा पुजारी यांना सापळा पथकात सामील करण्यात आले.

नमुद शासकीय वाहनामधुन पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे साहित्य घेऊन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सातारा येथुन बाहेर पडुन आम्ही, सापळा पथक व दोन शासकीय पंचासह ओगलेवाडी रेल्वे स्टेशनजवळील मोकळ्या जागेत 11.00 वा. चे सुमारास पोहचलो त्यावेळी एक इसम होंडा ड्रिम युगा दुचाकी वाहन क्रमंाक एम एच 10 सी डी 7586 वर हजर होता. तेव्हा त्यास

त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव श्री शंकर आण्णा रास्कर, वय 50 वर्षे, व्यवसाय - सिक्युरीटी एजन्सी, रा.शिवाजीनगर ता.कडेगाव जि.सातारा असल्याचे सांगीतले व ते तक्रारदार असल्याचे सांगीतले. सदर वेळी तक्रारदार शंकर रास्कर व नमुद दोन्ही पंच यांची एकमेकांची ओळख करुन दिली तसेच सापळा पथकातील अधिकारी अंमलदार यांची ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही पंच साक्षीदार यांना तक्रारदार शंकर रास्कर यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे आहे त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र.1 म्हणून श्री. शरद नारायण रोकडे पंच क्र.2 म्हणून श्री. आनंद शामराव खैरमोडे हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांनी त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन केली व नंतर लेखी स्वरुपात दिली ती पुढीलप्रमाणे. मी वरीलप्रमाणे असुन माझी सार्थ सिक्युरिटी फोर्स नावाची एजन्सी असुन त्याचा रजिष्टर नंबर PSA-L-35-MH-2023-MAR-3-2903 आहे. कार्यकारी अभियंता टेंभु उपसा सिंचन यांत्रिकी व विद्‌युत पथक योजना ओगलेवाडी ता.कराड जि.सातारा येथे माझ्या सिक्युरीटी एजन्सीकडुन 03 सुरक्षारक्षक दिनांक 23/09/2024 ते दिनांक 30/09/2025 या कालावधीत पुरविण्यात आले होते. सुरक्षारक्षक पुरविण्याचे कामाचे टेंडर एकुण 9,64,440/-रुपयांना मंजुर झाले आहे. माझे शिक्षण 10 वी पर्यंत झाले असुन मला मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान आहे.

माझ्या एजन्सीसोबत करार झाल्यानुसार मी कार्यकारी अभियंता टेंभु उपसा सिंचन यांत्रिकी व विद्‌युत पथक योजना ओगलेवाडी ता.कराड जि.सातारा यांना 03 सुरक्षारक्षक पुरविले होते. सुरक्षा रक्षकास प्रत्येक दिवसास 610/- रुपये प्रमाणे पगार मंजुर करण्यात आला होता. सुरक्षारक्षक पुरविलेनंतर त्याचे एकुण 594720/- रुपयांचे बिल दिनांक 23/09/2025 रोजी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे कार्यालयास टेंभु कार्यालय कराड येथुन पाठविण्यात आले होते. त्यानुसार दिनांक 12/11/2025 रोजी माझ्या खात्यावर 4,66,960/- रुपये जमा झाले आहेत.

माझ्या कामासाठी दिनांक 17/11/2025 रोजी दुपारी 2.00 वा. चे सुमारास टेंभु उपसा सिंचन कार्यालयास गेलो असता मला तेथे देवरे मॅडम, शाखा अभियंता भेटल्या व त्यांनी मला मंजुर झालेल्या बिलाच्या तीन टक्के प्रमाणे 14,000/- रुपयाची मागणी केली. मी सुरक्षारक्षक पुरविण्याचे काम करतो. देवरे मॅडम यांना पैसे दिले नाहीत तर त्या इथुन पुढे माझ्या एजन्सीला काम देणार नाहीत या भितीने मी त्यांना पैसे देण्यास होकार देवुन कार्यालयातुन निघुन आलो.

देवरे मॅडम या माझ्याकडे मागत असलेले 14,000/- रुपये ही लाच असल्याची माझी खात्री झाली आहे. परंतु त्यांना लाच देण्याची माझी अजिबात इच्छा नाही. मी आज दिनांक 19/11/2025 रोजी टेंभु उपसा योजना ऑफिस ओगलेवाडी ता.कराड येथे जावुन देवरे मॅडम शाखा अभियंता यांचेशी त्यांनी केलेल्या लाचेच्या मागणीबाबत चर्चा करणार आहे. त्यांचेकडुन मला लाचेची मागणी झाल्यास आपल्या विभागामार्फत त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

देवरे मॅडम शाखा अभियंता यांचेत व माझ्यात कोणतेही पुर्ववैमनस्य नाही अगर आर्थिक व्यवहार नाही.

वगैरे मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी स्वहस्ताक्षरात लिहून दिली नंतर सदरची तक्रार आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.

**I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)**

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. शंकर रास्कर यांचेकडे देवरे मॅडम, शाखा अभियंता या लाच मागणी करतात अगर कसे? याबाबतची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये सॅनडिस्क कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड वेस्टनातुन बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. तक्रारदार व पंच यांना व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती दिली तसेच त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली. तसेच पोहवा ताटे यांचेकडील रीअलमी कंपनीचा मोबाईल फोन दाखवुन त्यामध्ये सॅनडिस्क कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड घातले व सदर मेमरीकार्ड मध्ये पडताळणी, सापळा कारवाई निवेदन, लाच रक्कम व कागदपत्रे जप्त करतानाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार, तक्रारदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर 13.21 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार रास्कर व पंच क्र.1 शरद रोकडे पंच क्र. 02 आनंद खैरमोडे यांचे पडताळणी कारवाईचे निवेदन घेतले. सदर निवेदनाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. व्हॉईस रेकॉर्डर तक्रारदार श्री. रास्कर यांचे शर्टचे आतील बनियानला सेफटी पिन च्या सहाय्याने लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01 श्री. शरद रोकडे यांचेसह पडताळणीकामी ओगलेवाडी रेल्वे स्टेशन जवळुन तक्रारदार यांचे दुचाकीवरुन रवाना केले.

त्यानंतर आम्ही सापळा पथक पंच क्र.02 असे ओगलेवाडी रेल्वे स्टेशन येथे थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 13.39 वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 रोकडे यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे टेंभू उपसा सिचंन योजना कार्यालय, ओगलेवाडी, कराड येथे गेलो असता सदर ठिकाणी तक्रारदार रास्कर हे जावुन एका मॅडम सोबत बोलु लागले तेव्हा मला ते देवरे मॅडम असल्याचे समजले. त्यावेळी तक्रारदार नमस्कार मॅडम असे म्हणाले, त्यावर लोकसेवक नमस्ते, "केला का?" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "न्हायना, नाही केल" असे म्हणाले, त्यावर देवरे मॅडम "मग आता" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "तुमच्याशी चर्चा करायची मग ठरवायचं म्हंटल, आता आलुय दवाखान्यात आमची आय आजारी, ऍडमिट हाय असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "मी त्यांना करेक्शन होते करून दिले. मी कुठे अडवले काय अडवले नाही, तुमचे मला म्हंटले काल मिसाळ त्यांची सीएमपी झाले पण ते आलेच नाहीत साहेबंानी सांगितलंय ते आल्याशिवाय ठेवायची नाहीत म्हणुन कारण दोन बिलं होती माझ्याकडची तुमच्याकडंच एक होत सार्थ तुमचं सार्थ ना, दुसरं एक होतं इगलच ते एक एस्केस च एक बदलायचं होत ते बदललं मागचं तुमचं झालं ना पण, तुम्ही गेला नाय का साहेबांकडं" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "नाय" असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम का अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "मम्मी आजारी असल्यामुळं मी कुठं आता दवाखान्यात हे काय होतं आमचं, काय होत म्हटंल, अचानक म्हणुन म्हंटल बघायचं कोण कोण भेटतंय ऑफिसमध्ये आणि मग ते ना म्हटंल मग बाकीची प्रोसेस हाय" असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "काय आता अडचण हाय का तुमची" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "अडचण नाय अडचण झाली क्लिअर आता म्हणजे घेऊन यायंच एक दोन दिवसांत अडचणीच नाय काय" असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "सांगा ना मग तसं, साहेबांना

फोन करा कधी कम्प्लांयन्स ला येतो, सगळयाचा कम्प्लांयन्स केलाय ना" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "नाही नाही नाय....नाय कोणाचाच नाय तुमचा फोन आला म्हणुन मी तुमच्याकडे आलोय म्हणुन" असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "आज आहेत साहेब पण आता ऑन द वे आहेत ते आता काय इथे नाही येणार ते आता त्यांना सांगलीला निरोप आलाय म्हणुन अर्जंटली म्हणून ते सांगलीला जाणार कोल्हापुर नाकयावर यायला सांगितलंय इथल्या मुलाला तो त्यांना तिथे देणार आहे पेपर्स मग येणार होते ऑफिसमध्ये तसं मग नियोजन लागलं फोन करा मग साहेबांना आणि मग तसा दया निरोप की असं काय, बिल पाठवा पुढं" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "आता कसं आहे माहितीय का, साहेबांचा विषय आहे ना आता प्रत्येकजण एका वेळेला कोण भेटणार नाही आपल्याला काय, आता मी परत आलो तर तुम्ही भेटणार नाही बरोबर ना, एखादयावेळेस साहेब नसणार, मग आता एकवर एकवर एकच करावं लागेल" असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "मग बघा मग कस कसही करा" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "हा मग तुमचं किती होतं" असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "करा मग माझं" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार आ असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "काढली का अमाऊंट" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "नाही, काढा की तुम्ही" असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "दोन मिनिंट थांबा, तुम्ही तयार करा आणि हे करा, इनव्हलप करुन आणा म्हणजे मी तुम्हांला सांगते चेक अमाऊंट किती आहे तुमची, बिलं भरलंय किती ते पाच चौ-यान्नव होतं का बिल" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "हा पाच चौ-यान्नवचेच" असे म्हणाले, त्यानंतर लोकसेवक देवरे मॅडम व तक्रारदार यांनी त्यांचे कामाबाबत चर्चा केली त्यावेळी लोकसेवक देवरे मॅडम यांनी कॅल्कुलेटर काढुन त्यावर तक्रारदार यांच्या बिलाचा हिशोब करण्यास सुरवात केली व तक्रार
व तक्रारदार यांना "टोटल चेक अमाऊंट चार सदुसष्ठ नऊशे सात, पाच त्रिक पंधरा होणार" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार आ असे म्हणाले, त्यावर लोकसेवक "पंधरा होणार" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "पंधरा किती पंधरा असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "चार सदुसष्ठ झाल ना पेमेंट हे कार्य पार्ट टु चे तुम्हांला मिळतात रिलीज होतात" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "किती होतात" असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "हे दोन्ही मिळणार ना तुम्हांला हे नंतर मिळतात ना" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार हा असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "पार्ट फाईव्हचे सोडलेत ते चार आणि एक पाच, चार सहासष्ठ, प्लस एक सत्ताविस, अ.. पाच तर आहे ना, इन टु तीन, सतरा एकोणऐंशी होत्यात" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "सतरा एकोंणऐंशी म्हणजे सतरा हजार रॉउंड फिगर करतो" असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "सतरा हजार करा" अशा म्हणाल्या, त्यानंतर तक्रारदार "मी येताना फोन करून येतो" असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "हो चालेल किती वेळात येता मी नंतर जाणार आहे चार वाजता" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "मी चारच्या पुढे येतो, की उदया सकाळी येतो असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "नाही उदया नाहीये मी या फोन करुन या, तुम्ही किती वाजतील तरी तुम्हांला" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "मी आता कडेगांवला जाणार आहे, घरी जरावरुन मग बाकीचे हे करुन मग तुम्हांला फोन करतो मी" असे म्हणाले, त्यावर लोकसेवक "मी आहे या, आहे" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार ठिक आहे. चालेल ओके असे म्हणून ऑफिसमधून बाहेर आलो. त्यानंतर मी व तक्रारदार असे यांच्या दुचाकी वाहनावरुन पुन्हा ओगलेवाडी, कराड येथे परत आलो.

वैगेरे मजकूरची हकिगत सांगितली.

त्यानंतर तक्रारदार यांना हकीकत विचारली असता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक देवरे मॅडम या कोणत्या साहेबांना भेटण्यास सांगत आहेत असे विचारले असता तक्रारदार यांनी देवरे मॅडम बिल तयार करतात व त्यावर एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर काळमेघ साहेब सही करतात व त्यानंतर बिल मंजुरीस कृष्णा खोरे महामंडळ पुणे येथे पाठविले जाते व मंजुर होते असे सांगीतले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना पंचासमक्ष काळमेघ साहेब कुठे आहेत याबाबत विचारणा केली असता काळमेघ साहेब कार्यालयात नसल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकुन ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीप्रमाणे देवरे मॅडम, शाखा अभियंता यांनी तक्रारदार यांचेकडे तक्रारदार यांचे सुरक्षारक्षक पुरविलेबाबतचे एकुण 5,94,720/- रुपये बिल पाठविले म्हणुन बिलाच्या तीन टक्केप्रमाणे 17,000/- रुपये लाचेची मागणी पंच नंबर 1 यांचेसमक्ष केल्याचे व लाच रक्कम घेवुन 16.00 वा बोलाविलेचे निष्पन्न झाले. तसेच देवरे मॅडम यांनी तुम्ही गेला नाय का साहेबांकड असे म्हणुन तक्रारदार यांना बिल मंजुरीसाठी पाठविणारे काळमेघ साहेबांना भेटण्यास सांगीतले. पडताळणी कारवाईवेळी देवरे मॅडम यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली परंतु काळमेघ साहेब यांना भेटण्यास सांगीतलेने काळमेघ साहेब यांची पडताळणी करण्याचे नियोजन करण्यात आले. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगीतले की काळमेघ साहेब हे कार्यालयात उपस्थित नाहीत.

त्यानंतर आम्ही, पंच व सापळा पथक ओगलेवाडी येथेच थांबुन राहीलो. त्यावेळी तक्रारदार यांना देवरे मॅडम यांचा मिसकॉल आलेने 14.16 वा. तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल फोन नंबर 9921419532 वरुन देवरे मॅडम यांचा मोबाईल फोन नंबर 7020489598 वर फोन केला असता लोकसेवक देवरे मॅडम यांनी तक्रारदार यांचेशी इतर कामाबाबत चर्चा केली व तक्रारदार यांना "तुम्ही येणार आहेत का कन्फर्मली" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "मग काय करू मी" असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "ऑनलाइन करा ना" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "हा, हे आहे तुम्ही म्हणला होता आता साहेब आहेत ना आता सावंत साहेब का काळमेघ साहेब कुणाशी भेटू, का तुमच्याकडेच करू आता ते नवीन आहेत त्यामुळे मी कधी त्यांच्याशी व्यवहार केला नाही, तुम्ही जुन्या आहे सा" असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "नाही नाही त्यांच्याशी त्यांच्याशी बोला, त्यांच्याशी त्यांच्याशी बोलून टाका, ते त्यांच त्यांच बरोबर बोलतील, मग माझं जे तुम्हाला सांगितले ते तुम्ही कसं करताय बघा ऑनलाइन करताय का तुम्ही येणार" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "नाही ऑनलाइन नाही, कॅश, कॅश असे म्हणाले," त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "बर ठिक आहे, मग कधी मी चारपर्यंत थांबते, चार पाच वाजता या" त्यानंतर तक्रारदार व देवरे मॅडम यांनी इतर चर्चा केली तेव्हा लोकसेवक देवरे मॅडम "हा माझ आज करा कारण साहेब असणार आहे की उद्या" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "असणार काय मग ठिक आहे" असे म्हणाले, त्यावर लोकसेवक असणार आहे उद्या काळमेघ साहेब बर ठिक आहे" अशा म्हणाल्या. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक देवरे मॅडम यांचेशी इतर चर्चा केली व फोन ठेवला.

लोकसेवक काळमेघ यांची पडताळणी कारवाई न झाल्याने लोकसेवक यांना लाच रक्कम आज

देण्यात येणार नसल्याचे पंचांचे व तक्रारदार यांचे सहमतीने ठरविण्यात आले. त्यानुसार तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल फोन नंबर 9921419532 वरून लोकसेवक देवरे मॅडम यांचे मोबाईल फोन नंबर 7020489598 वर कॉल केला ती वेळ 17.00 वा. ची होती. त्यावेळी लोकसेवक हॅलो अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "मॅडम येतो म्हटलं होतं खरं तुम्हाला, याचं झालं नाही मला काय" असे म्हणुन "बघू मग सोमवारीच भेटतो मग, जरा शनिवार, रविवार आयला डिस्चार्ज बी देतील" असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "सोमवारी कन्फर्म येणार आहे का?" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "हो मी येणार ना" असे म्हणाले, त्यावर लोकसेवक देवरे मॅडम "माझी रजा हाय ओ, मी रजेवर आहे, मग ओ महिनाभर" अशा म्हणाल्या, त्यावर तक्रारदार "नाही, नाही मी सगळं हेच करून घेऊन येतो ना, हॅलो" असे म्हणाले व इतर चर्चा केली व फोन ठेवला.

दिनांक 19/11/2025 रोजीची लोकसेवक काळमेघ यांची भेट न झाल्याने सापळा कारवाई स्थगित करण्यात आली. तक्रारदार यांना गोपनीयतेच्या सुचना देवुन घरी जाणेस सांगीतले व दिनांक 20/11/2025 रोजी सकाळी 10.00 वा. ओगलेवाडी रेल्वे स्थानकाजवळील मोकळ्या जागेत उपस्थित राहण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही, सापळा पथक, पंच असे ओगलेवाडी कराड येथुन निघुन ला.प्र.वि.कार्यालय सातारा येथे जावुन पंचनामा कारवाई पुर्ण केली. पंचांना व सापळा पथकास गोपनियतेच्या सुचना देवुन दिनांक 20/11/2025 रोजी सकाळी 9.00 वा. ला.प्र.वि.कार्यालयात उपस्थित राहण्याच्या सुचना दिल्या.

दिनांक 20/11/2025 रोजी आम्ही, पंच व सापळा पथकासह ओगलेवाडी रेल्वे स्थानकाजवळील मोकळ्या जागेत उपस्थित राहीलो. तेव्हा तेथे तक्रारदार रास्कर हे उपस्थित होते. त्यावेळी आम्ही पुन्हा तक्रारदार यांना पंचाची व सापळा पथकाची एकमेकांना ओळख करुन दिली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. शंकर रास्कर यांना एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर काळमेघ साहेब यांचेकडे पडताळणी कामी आवश्यक त्या सुचना देवुन 11.40 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार पंचाची निवेदने घेतली. सदर निवेदनाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. त्यानंतर तक्रारदार श्री. रास्कर यांचे शर्टचे आतील बनियानला सेफटी पिन च्या सहाय्याने लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01 श्री. शरद रोकडे यांचेसह पडताळणीकामी ओगलेवाडी रेल्वे स्टेशन जवळुन तक्रारदार यांचे दुचाकीवरुन लोकसेवक काळमेघ यांची भेट घेणेकामी टेंभु उपसा सिंचन ऑफिस येथे रवाना केले.

त्यानंतर आम्ही सापळा पथक पंच क्र.02 असे ओगलेवाडी रेल्वे स्टेशन येथे थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 11.48 वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 रोकडे यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे टेंभु उपसा सिंचन ऑफिस येथे गेलो असता काळमेघ साहेब हे कार्यालयात हजर नव्हते म्हणुन तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक 9921419532 वरुन काळमेघ साहेब यांचा मोबाईल क्रमांक 9422202583 वर फोन केला असता काळमेघ यांनी "दुपारी फोन करतो" असे सांगीतले. त्यानंतर मी व तक्रारदार पुन्हा तक्रारदार यांचे दुचाकीवरुन सापळा पथक थांबले ठिकाणी परत आलो. वगैरे हकीकत सांगीतली. तेव्हा तक्रारदार यांना हकीकत विचारता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली.

त्यानंतर दिनांक 20/11/2025 रोजी 13.44 वा चे सुमारास एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर काळमेघ कार्यालयात आले आहेत का याची चौकशी करण्यासाठी तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल फोनवरुन काळमेघ यांचे मोबाईल फोन नंबर 9422202583 वर फोन केला त्यावेळी तक्रारदार "अं.. सकाळी फोन केला होता मग येणार आहे तुम्ही" असे विचारले असता काळमेघ यांनी "मी फोन करीन, निघताना फोन करतो तुम्हांला हां", "कोल्हापूरात आहे कोल्हापूर" असे तक्रारदार यांना सांगीतले. एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर काळमेघ हे कोल्हापुर येथे असल्याने त्यांचे निरोपाची वाट पाहत ओगलेवाडी कराड येथे सापळा पथकासह थांबुन राहीलो. एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर काळमेघ यांचा निरोप न आल्याने व कार्यालयाची वेळ संपल्याने दिनांक 20/11/2025 रोजीची कारवाई सर्वानुमते स्थगित करण्यात आली व तक्रारदार यांना दिनांक 21/11/2025 रोजी सकाळी 10.00 वा. ओगलेवाडी रेल्वे स्थानकाजवळील मोकळ्या जागेत उपस्थित राहण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर ला.प्र.वि.कार्यालय सातारा येथे जावुन पंचनामा कारवाई पुर्ण केली. पंचांना व सापळा पथकास दिनांक 21/11/2025 रोजी सकाळी 9.00 वा. ला.प्र.वि.कार्यालयात उपस्थित राहण्याच्या सुचना दिल्या.

दिनांक 21/11/2025 रोजी आम्ही, पंच, सापळा पथक शासकीय वाहनातुन सकाळी ओगलेवाडी रेल्वे स्थानकाजवळील मोकळ्या जागेत उपस्थित राहीलो. तेव्हा तेथे तक्रारदार रास्कर हे उपस्थित होते.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. शंकर रास्कर यांना एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर काळमेघ साहेब यांचेकडे पडताळणी कामी आवश्यक त्या सुचना देवुन 12.29 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार पंचाची निवेदने घेतली. सदर निवेदनाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. त्यानंतर तक्रारदार श्री. रास्कर यांचे शर्टचे आतील बनियानला सेफटी पिन च्या सहाय्याने लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01 श्री. शरद रोकडे यांचेसह पडताळणीकामी ओगलेवाडी रेल्वे स्टेशन जवळुन तक्रारदार यांचे दुचाकीवरुन लोकसेवक काळमेघ यांची भेट घेणेकामी टेंभु उपसा सिंचन ऑफिस येथे रवाना केले. तक्रारदार पंच नंबर 1 सह सापळा पथक थांबले ठिकाणी 12.42 वा.परत आले. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 रोकडे यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे टेंभु उपसा सिंचन ऑफिस येथे गेलो असता काळमेघ साहेब हे कार्यालयात हजर नव्हते म्हणुन तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल वरुन काळमेघ साहेब यांचे मोबाईल वर फोन केला असता त्यांनी "साडेतीन वाजता येणार आहे ऑफिसला" असे सांगीतले. त्यावर तक्रारदार "साडेतीन वाजता ठिक आहे चालतंय थांबतो मी" असे म्हणाले त्यानंतर मी व तक्रारदार सापळा पथक थांबले ठिकाणी परत आलो.

त्यानंतर एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर काळमेघ यांनी दुपारी 3.30 वा येणार असल्याचे सांगीतलेने दिनांक 21/11/2025 रोजी 15.10 वा पुन्हा व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांना पंच नंबर 1 यांचे सोबत एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर काळमेघ यांची भेट घेण्यासाठी रवाना केले ते 15.25 वा. परत आले. त्यावेळी पंच नंबर 1 यांना हकीकत विचारली असता त्यांनी सांगीतले की, आम्ही टेंभु उपसा सिंचन कार्यालयात गेलो असता तक्रारदार यांनी काळमेघ यांचे चेंबरच्या बाहेरील इसमास "नमस्कार साहेब काळमेघ साहेब आहेत?" असे विचारले असता त्यांनी "नायत आले नायत" असे सांगीतले. त्यावेळी देवरे मॅडम या तकारदार यांचेकडे आल्या व त्यांना "आला काय" असे म्हणाल्या तेव्हा तक्रारदार "हो साहेबांची भेट झाली नाय, साहेबाची भेट झाली नाय, साहेबांनी आता बोलवलय" असे म्हणाले. त्यावर देवरे मॅडम तक्रारदार यांचेशी चर्चा करुन "आमचं करुन टाकाना" असे म्हणाल्या

तेव्हा तक्रारदार "अस का" असे म्हणाले. त्यावर देवरे मॅडम "हो परत मी नाहीये तुला सांगितल नाय का मी रजेवर चाललीय म्हणून मंग नुसतच येजा येजा कराय लागला" असे म्हणाल्या. त्यावर तक्रारदार "बर ठिक आहे, म्हटल साहेबाशी चर्चा करु" असे म्हणाले त्यावर देवरे मॅडम "करा मी आहे अर्धा तास अजून" असे म्हणाल्या त्यानंतर मी व तक्रारदार कार्यालयाचे बाहेर आलो. तेथे तक्रारदार यांना भेटलेल्या इसमासोबत तक्रारदार यांनी चर्चा केली त्यानंतर मी व तक्रारदार पुन्हा सापळा पथक थांबले ठिकाणी परत आलो. तक्रारदार यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली.

दिनांक 21/11/2025 रोजी तक्रारदार यांची व काळमेघ यांची भेट न झाल्याने पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली. तक्रारदार यांना एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर काळमेघ यांचा निरोप आल्यानंतर आम्हास संपर्क साधण्याचा सुचना देण्यात आल्या. ला.प्र.वि.सातारा कार्यालयात पंचनामा कारवाई पुर्ण करण्यात आली.

दिनांक 26/11/2025 रोजी तक्रारदार यांना एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर काळमेघ हे कार्यालयात उपस्थित असलेबाबत निरोप आलेचे तक्रारदार यांनी कळविलेने त्यांना ओगलेवाडी रेल्वे स्टेशन जवळ येवुन थांबण्यास सांगीतले. त्यानंतर आम्ही, पंच, सापळा पथक शासकीय वाहनातुन सकाळी 11.10 वा. ओगलेवाडी रेल्वे स्थानकाजवळील मोकळ्या जागेत उपस्थित राहीलो. तेव्हा तेथे तक्रारदार रास्कर हे उपस्थित होते.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. शंकर रास्कर यांना एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर काळमेघ साहेब यांचेकडे पडताळणी कामी आवश्यक त्या सुचना देवुन 11.40 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार पंचाची निवेदने घेतली. सदर निवेदनाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. त्यानंतर तक्रारदार श्री. रास्कर यांचे शर्टचे आतील बनियानला सेफटी पिन च्या सहाय्याने लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01 श्री. शरद रोकडे यांचेसह पडताळणीकामी ओगलेवाडी रेल्वे स्टेशन जवळुन तक्रारदार यांचे दुचाकीवरुन लोकसेवक काळमेघ यांची भेट घेणेकामी टेंभु उपसा सिंचन ऑफिस येथे रवाना केले. तक्रारदार पंच नंबर 1 सह सापळा पथक थांबले ठिकाणी 12.12 वा.परत आले. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 रोकडे यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे टेंभु उपसा सिंचन ऑफिस येथे गेलो असता काळमेघ साहेब हे कार्यालयात हजर नव्हते म्हणुन तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल वरुन काळमेघ साहेब यांचे मोबाईल वर फोन केला असता त्यांनी फोन उचचला नाही म्हणुन वाट पाहुन मी व तक्रारदार सापळा पथक थांबले ठिकाणी परत आलो. तक्रारदार यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली.

त्यानंतर एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर काळमेघ यांनी त्यांचा मोबाईल नंबर 8551058580 वरुन तक्रारदार यांचा मोबाईल नंबर 9921419532 वर दुपारी 3.35 वा फोन करुन ते सायंकाळी 5.00 वा कार्यालयात येणार असल्याचे सांगीतले. त्यानुसार तक्रारदार व पंचांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने सुचना देवुन दिनांक 26/11/2025 रोजी 17.18 वा पुन्हा व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांना पंच नंबर 1 यांचे सोबत एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर काळमेघ यांची भेट घेण्यासाठी रवाना केले ते 17.51 वा. परत आले. त्यावेळी पंच नंबर 1 यांना हकीकत विचारली असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार टेंभु उपसा सिंचन कार्यालयात गेलो असता तक्रारदार यांनी काळमेघ यांचे कक्षात जावुन "आत येवु साहेब नमस्कार"असे विचारले त्यावर काळमेघ यांनी माझ्याकडे

हाताने खुनावुन विचारणा केली तेव्हा तक्रारदार यांनी "हे आमचे बंधु हायती"असे सांगीतले. त्यावर काळमेघ साहेब "अच्छा" म्हणाले. त्यावर तक्रारदार "पहिले पुण्याला काम करत होते आपल्या एजन्सीत करत होते" असे म्हणाले व हां काजे साहेबांशी परिचय आहे" असे सांगीतले. त्यावेळी तक्रारदार "ते अकौंटला साडेसहा हजारच बिल जमा झालय, साडेसहा अं साडेचार हजारांच लाखाच लाख चार लाख सेहचाळीस हजारांच बिल जमा झालय ते मॅडम ना भेटलो" असे म्हणाले. त्यावर काळमेघ साहेब बर असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "भेटलो तर म्हणल साहेबांना पण भेटा" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व काळमेघ साहेब यांनी त्यांचे बिलाचे कामाबाबत चर्चा केली. त्यावेळी तक्रारदार "ते मॅडम नी सांगितलय तीन माझ" असे म्हणाले. त्यावर काळमेघ साहेब अ काय असे म्हणाले त्यावर तक्रारदार "तीन टक्क्यान" असे म्हणाले. त्यावर काळमेघ साहेब "माझ" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "मॅडमच" म्हणाले. त्यावर काळमेघ "सावंतच असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "सावंत च काय त्याच अजुन काय चर्चा नाय" असे म्हणाले. त्यानंतर पुन्हा तक्रारदार व काळमेघ साहेब यांनी कामाबाबत चर्चा केली. तेव्हा काळमेघ साहेब "वर्कशॉप चा पण काम करण्याचा बर ठिक आपल कस करता ते सांगा" असे तक्रारदार यांना म्हणाले तेव्हा तक्रारदार "आता तुमचा रोल मला माहिती तुम्हीच बोलला पाहिजे ना मग तर माझ्याकडन होवुन जाईल तुमचा रोल मला माहिती नाही" असे म्हणाले. त्यावर काळमेघ "आमच्याबर काय करण्याचा रोल हाय का" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "नाय नाय बाकीचा" असे म्हणाले. त्यावर काळमेघ "काकडला किती गेल, काकडला किती दिल" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी "सेव्हन" असे सांगीतले. त्यावर काळमेघ यांनी "सेव्हन काय" असे विचारले त्यावर तक्रारदार "टक्के" असे म्हणाले. त्यावर काळमेघ हे "मग आम्हाला ही द्या तेवढे" असे म्हणाले त्यावर तक्रारदार "अमाउंट, अमाउंट करा की" त्यावर काळमेघ "अमाऊंट तुम्ही काढा तुम्हाला येते ना मग" असे म्हणाले व "म्हणजे ज्या सही करायला 5 टक्के हं तेच तर महत्वाचे आहे" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचेकडील मोबाईलवर 20,000/- असे टाईप करुन दाखविले. त्यावर काळमेघ "हे कमी होतयं ना कमी होतयं ना" असे म्हणाले व "काकड साहेब होते तेवढ होयला पाहिजे ना ओ" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "ऑर्डर ला करतो, ऑर्डर ला करतो" असे म्हणाले. त्यावर काळमेघ साहेब "राऊंड फिगर करुन घ्या तीस" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "अं, तेवढ म्हणताय तीस हजार रुपये लय व्हत्यात" असे म्हणाले. त्यावर काळमेघ "होय" म्हणाले. त्यावर तक्रारदार "होय तर" असे म्हणाले. त्यावर काळमेघ "मग पंचवीस" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "ठिक हे, डन, ठिक है, काय करतो अं, उद्या किती वाजता हाय तुम्ही" असे म्हणाले. त्यावर काळमेघ "संध्याकाळी असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "संध्याकाळी, अं दुपारी" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "दुपारी लग्नाला चाललो मुलाचं" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार चर्चा करुन "मग परवा दिवसा" असे म्हणाले. त्यावर काळमेघ "परवा मग, सकाळी सकाळी लेट नाही परवा एकदम सकाळी" असे म्हणाले व "लेट नाही झाले पाहिजे" असे म्हणाले त्यावर तक्रारदार "नाय नाय दहा वाजता" असे म्हणाले. त्यावर काळमेघ "चालेल" असे म्हणाले. त्यानंतर काळमेघ साहेब यांनी बेल वाजुवन सावंत साहेबांना केबिनमध्ये बोलावुन घेतले व त्यांनी त्यांचे कार्यालयीन कामाबाबत चर्चा केली. त्यानंतर मी व तक्रारदार कार्यालयाचे बाहेर आलो. तेथे तक्रारदार यांना भेटलेल्या इसमासोबत तक्रारदार यांनी चर्चा केली त्यानंतर मी व तक्रारदार पुन्हा सापळा पथक थांबले ठिकाणी परत आलो. तक्रारदार यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत

सांगीतली.

एकंदरीत दि.26/11/2025 रोजी तक्रारदार यांना एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर, काळमेघ यांचेकडे पडताळणी कामी पाठवले असता सदर पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांना एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर, काळमेघ यांनी बिल मंजुरुसाठी पाठविले म्हणुन एकुण 25,000/- रुपये लाचेची मागणी केली. तसेच लाच रक्कम घेवुन दिनांक 28/11/2025 रोजी सकाळी बोलाविले असल्याचे निष्पन्न झालेने दिनांक 28/11/2025 रोजी सापळा कारवाईचे सर्वानुमते ठरविण्यात आले. पंचांना व तक्रारदार यांना दिनांक 28/11/2025 रोजी उपस्थित राहण्याच्या सुचना देण्यात आल्या. ला.प्र.वि.सातारा कार्यालयात पंचनामा कारवाई पुर्ण करण्यात आली.

दिनांक 28/11/2025 रोजी आम्ही पंच व सापळा पथकासह सकाळी 11.30 वा. ओगलेवाडी रेल्वे स्थानकाजवळील मोकळ्या जागेत खाजगी वाहनाने व शासकीय वाहनातुन उपस्थित राहीलो. तेव्हा तेथे तक्रारदार रास्कर हे उपस्थित होते. त्यावेळी आम्ही पुन्हा तक्रारदार यांना पंचाची व सापळा पथकाची एकमेकांना ओळख करुन दिली.

त्यानंतर मी दोन्ही पंचांना व तक्रारदार श्री रास्कर यांना सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरू करण्यात येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार रास्कर यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी त्यांचेकडील लाच रक्कम 42,000/- रुपये हजर केले. त्यामध्ये 500 रु दराच्या 84 चलनी नोटा होत्या. सापळा पथकातील अंमलदार यांनी हजर केलेल्या नोटांपैकी 17,000/- रुपये नोटांचे नंबर एका कागदावर व लोकसेवक काळमेघ यांना देण्यासाठी हजर केलेल्या 25,000/- रुपयांच्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन काढले. त्यानंतर मी तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले. मी दोन्ही पंचांना पडताळणी व सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची अंगझडती व लाचेची रक्कम जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण पडताळणी कारवाई निवेदन व्हिडीओ रेकॉर्डिंग केलल्या मोबाईलमध्ये करण्यात येणार असुन सदर चित्रीकरण मोबाईल मधील मेमरी कार्ड मध्ये सेव्ह करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर मी दोन्ही पंचांना व तक्रारदार श्री रास्कर यांना अन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. तसेच सापळा पथकाचे मदतीने खाजगी वाहनाचे काळया पडदयाचे सहाय्याने खिडक्या बंद केल्यानंतर कृत्रीम अंधारात त्याचे प्रात्यक्षिक पोहवा पुजारी यांनी करून दाखवले. त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेली लाच रक्कम पोहवा पुजारी यांना ॲन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिली असता, पोहवा पुजारी यांनी कापसाच्या बोळयाने सगळया चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस तसेच खाकी रंगाच्या लखोट्यास ॲन्थ्रासीन पावडर लावली व त्यांनतर पोहवा पुजारी यांनी सदर लाचेच्या रकमेतील 17,000/- रुपये लाच रक्कम खाकी लखोटयात ठेवुन तक्रारदार श्री रास्कर यांचे शर्टाचे वरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवली. तसेच 25000/- रुपये लाच रक्कमेस व खाकी लखोट्यास ॲन्थ्रासीन पावडर लावली व त्यांनतर पोहवा पुजारी यांनी सदर लाचेच्या रकमेतील 25,000/- रुपये लाच रक्कम खाकी लखोटयात ठेवुन तक्रारदार श्री रास्कर पॅन्टचे उजव्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर पोहवा पुजारी यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले.

त्यानंतर मी पंचांना, तक्रारदार व सापळा पथकातील पोलीस अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या. त्याचवेळी

तक्रारदार यांनी लोकसेवक काळमेघ  व लोकसेवक देवरे मॅडम यांना लाच रक्कम दिल्यानंतर कार्यालयाचे बाहेर येवुन डावा हात डोक्याचे केसावरुन दोनदा फिरवण्याचा पुर्वनियोजीत इशारा ठरविण्यात आला.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार श्री रास्कर त्यानंतर पंच क्र.01 व पंच क्र.02 यांचे सापळा निवेदन ध्वनीमुद्रीत केले ती वेळ 12.31 वा ची होती. सदरचे निवेदन घेताना पोहवा ताटे यांनी त्यांचेकडील मोबाईलमध्ये व्हिडीओ चित्रीकरण केले असुन सदर चित्रीकरण मोबाईल मधील मेमरी कार्ड मध्ये सेव्ह करण्यात आले आहे.

त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टचे आतील बनियानला आतील बाजूस सेफ्टी पिनच्या सहाय्याने लाऊन देऊन तक्रारदार यांना पंच क्र.01  यांचे सह तक्रारदार यांचे होंडा ड्रिम युगा दुचाकी वाहन क्रमंाक एम एच 10 सी डी 7586 वरुन लोकसेवक काळमेघ व देवरे मॅडम यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता टेंभु उपसा सिंचन ऑफिस येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र.02 व सापळा पथक असे सापळा कारवाई कामी लागणाऱ्या आवश्यक साहित्यासह खाजगी वाहनाने तक्रारदार यांचे पाठोपाठ निघालो व टेंभु उपसा सिंचन ऑफिस च्या बाजूस वाहन उभे करून कार्यालयाचे आवारात कोणासही संशय येणार नाही अशा रितीने थांबून राहिलो.

तक्रारदार व पंच क्र.01 हे लोकसेवक यांचे कार्यालयात गेले व काही वेळाने तक्रारदार हे कार्यालयातुन बाहेर आल्यानंतर तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्वनियोजित इशारा केला असता आम्ही व सापळा पथक असे टेंभु उपसा सिंचन ऑफिस येथे आलो. आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 12.44 वाची होती. त्यानंतर यापूर्वी सुचना दिलेप्रमाणे पोहवा ताटे यांनी व्हिडीओ चित्रीकरण सुरु केले. त्यावेळी मी तक्रारदार यांना लाच रक्कम कोणी स्विकारली असे विचारले असता तक्रारदार यांनी कक्षातील एका इसमाकडे बोट दाखवुन हे लोकसेवक काळमेघ असल्याचे सांगितले तेव्हा मी पोशि शिंदे व थोरात यांना लोकसेवक काळमेध यांना अटकावुन ठेवण्यास सांगितले. त्यानंतर मी तक्रारदार यांना लोकसेवक देवरे मॅडम कोठे आहेत असे विचारले असता त्यांनी कार्यालयातील एका खुर्चीवर बसलेल्या महीलेकडे बोट दाखवुन त्या लोकसेवक देवरे मॅडम असल्याचे सांगितले तेव्हा माझे सुचनेवरुन मपोशि गुरव यांनी उजवा हात व मपोना जाधव यांनी डावा हात धरुन लोकसेवक देवरे मॅडम यांना  अटकावुन ठेवले.

त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक काळमेघ यांनी लाच रक्कम कुठे ठेवली याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की, मी माझ्याकडील पॅन्टच्या खिशात ठेवलेली अँथ्रासीन पावडर लावलेली 25,000/- रु लाच रक्कम पॅन्टचे खिशातुन उजव्या हाताने काढून लोकसेवक काळमेेघ यांचे पुढे धरली असता, त्यांनी ती घेवुन त्यांचे समोरील टेबलचे डाव्या बाजुच्या ड्रॉव्हर मध्ये  ठेवली आहे. सदरवेळी माझे सुचनेवरुन पंच नंबर 2 यांनी लोकसेवक काळमेघ यांचे टेबलच्या डाव्या बाजुच्या ड्राव्हर मधुन 25,000/-रुपये लाच रक्कम ताब्यात घेतली. पंच नं 2 यांनी नोटांचे नंबर हे त्यांचेकडील कागदावर लिहिलेल्या नंबरशी पडताळून पाहिले असता ते तंतोतंत जुळून आले. त्यानंतर लोकसेवक काळमेघ यांचे ऑफिसमध्ये लाईट बंद करून कृत्रिम अंधारामध्ये लोकसेवक काळमेघ यांचेकडून हस्तगत केलेली लाच रक्कम व त्यांचे दोन्ही हातांची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात पंचासमक्ष तपासणी केली असता लोकसेवक काळमेघ यांचे डाव्या हातास पुढील बाजूस निळसर

रंगाची चकाकी दिसून आली. तसेच हस्तगत केलेल्या लाच रक्कम 25,000/- रुपयेच्या चलनी नोटांवर, लखोट्यावर व लोकसेवक काळमेघ यांचे टेबलचे ड्रॉव्हरचे आतील बाजुस अँथ्रासीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तसेच पंच नंबर 2 व तक्रारदार यांचे हातासही अँथ्रासीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली.

त्यानंतर आम्ही लोकसेवक देवरे मॅडम यांचेजवळ जावुन लाच रकमेबाबत तक्रारदार यांना विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, मी माझ्याजवळील 17,000/-रुपये लाच रक्कम लोकसेवक देवरे मॅडम यांचे टेबलसमोर जावुन त्यांना दिली असता त्यांनी ती त्यांचे समोरील टेबलचे उजव्या बाजुच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवली आहे. सदरवेळी माझे सुचनेवरुन पंच नंबर 2 यांनी लोकसेवक देवरे मॅडम यांचे समोरील टेबलचे उजव्या बाजुच्या ड्रॉव्हर मधुन खाकी लखोट्यासह 17,000/-रुपये लाच रक्कम ताब्यात घेतली. मी पंच क्र. 2 यांना त्यांचे जवळील सापळा पुर्व कारवाई दरम्यानचे नोटांचे नंबर लिहून दिलेल्या कागदावरील नंबर एकच आहेत का? याबाबत खात्री करण्यास सांगितले. त्याप्रमाणे पंच नं 2 यांनी नोटांचे नंबर हे त्यांचेकडील कागदावर लिहिलेल्या नंबरशी पडताळून पाहिले असता ते तंतोतंत जुळून आले. त्यानंतर लोकसेवक देवरे मॅडम यांचे कार्यालयातील लाईट बंद करून कृत्रिम अंधारामध्ये लोकसेवक देवरे मॅडम यांचेकडून हस्तगत केलेली लाच रक्कम, लखोटा व टेबलचा ड्रॉव्हर व त्यांचे दोन्ही हातांची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात पंचासमक्ष तपासणी केली असता लोकसेवक देवरे मॅडम यांचे उजव्या हातास पुढील बाजूस निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तसेच हस्तगत केलेल्या लाच रक्कम 17,000/- रुपयेच्या चलनी नोटांवर व लखोट्यास अँथ्रासीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तसेच पंच नंबर 2 यांचे हातासही अँथ्रासीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर देवरे मॅडम यांना तक्रारदार यांचे कामाचे कागदपत्राबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांचे बिलाची स्थळप्रत दिदार शेख, वरिष्ठ लिपीक यांचे कार्यासनावर असल्याचे सांगीतलेने त्यांचेकडुन तक्रारदार यांचे बिलाची स्थळप्रत पंचासमक्ष जप्त केली त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये तक्रारदार यांना एकुण 5,94,720/- रुपयांचे बिल मंजुर झाले असुन, त्यापैकी इतर वजावटी 1,27,760/- रुपये झाल्या आहेत. तक्रारदार यांना वजावटी जाता एकुण 4,66,960/- रुपयांचे बिल प्राप्त झाले आहे.

त्यानंतर सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई शासकीय विश्रामगृह कराड येथे जावून करण्याचे सर्वानुमते निश्चित केले. शासकीय विश्रामगृह कराड येथे आम्ही पंच नंबर 1 यांना घडलेल्या हकीकतीविषयी विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचे दुचाकीवरुन टेंभु उपसा सिंचन ऑफिस ओगलेवाडी येथे गेलो तेव्हा तक्रारदार प्रथम काळमेघ साहेब यांचे कक्षासमोर जावुन चिठ्ठीवर नाव लिहुन दिले. त्यानंतर आम्ही देवरे मॅडम यांचेकडे गेलो त्यावेळी देवु असे म्हणुन लाच रक्कम असलेला खाकी लखोटा त्यांचे समोर धरला असता देवरे मॅडम यानी लखोटा घेवुन त्यांचे समोरील टेबलचे उजव्या बाजुच्या ड्रॉव्हर मध्ये ठेवुन दिला. त्यावेळी तक्रारदार "हे एकुण सतरा हजार रुपये आहेत तुमचे" असे म्हणाले त्यावर देवरे मॅडम "मी सतरा आठशे बोललेय" अशा म्हणाल्या त्यानंतर मी व तक्रारदार असे काळमेघ साहेब यांचे केबिनमध्ये गेलो. तेव्हा तक्रारदार "आत येवु साहेब, वेळ झाला साहेब" असे म्हणाले त्यावर काळमेघ साहेब "हाफ डे आहे दुपारपर्यंत" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "आपल ठरल्याप्रमाणे आणले सतरा हायती, पंचवीस हायती, मॅडमच सतरा आणि तुमच पंचवीस" असे म्हणाले व काळमेघ साहेब यांचे समोर

लाच रक्कम असलेला खाकी लखोटा धरला असता काळमेघ साहेब यांनी खाकी लखोटा घेवुन त्यांचे समोरील टेबलचे डाव्या बाजुच्या ड्रॉव्हर मध्ये ठेवुन दिला. त्यानंतर तक्रारदार यांनी कार्यालयाचे बाहेर येवुन डोक्याचे केसावरुन डावा हात दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने लोकसेवक देवरे मॅडम व लोकसेवक काळमेघ यांना ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना हकीकत विचारता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली.

तरी यातील तक्रारदार श्री शंकर आण्णा रास्कर, वय 50 वर्षे, व्यवसाय - सिक्युरीटी एजन्सी, रा.शिवाजीनगर ता.कडेगाव जि.सातारा यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. 19/11/2025, दिनांक 20/11/2025 दिनांक 21/11/2025, दिनांक 26/11/2025 रोजी पडताळणी कारवाई व दिनांक 28/11/2025 रोजी सापळा कारवाई करण्यात आली आहे. दिनांक 26/11/2025 रोजीच्या पडताळणी कारवाईवळी तक्रारदार श्री. शंकर आण्णा रास्कर यांना लोकसेवक आनंद रामदास काळमेघ वय 51 वर्षे, कार्यकारी अभियंता, टेंभु उपसा सिंचन व यांत्रिकी व विद्युत पथक ओगलेवाडी कराड ता.कराड जि.सातारा  मुळा रा जी/5बिल्डींग फ्लॅट नं 702 गंगाधाम फेज 2 मार्केट यार्ट पुणे सध्या रा रुम नं 27 दुसरा मजला सिल्वर ओक बिल्डींग SGM कॉलेज जवळ कराड ता कराड जि सातारा यांनी तक्रारदार यांचे मंजुर झालेल्या बिलाचे काम केले म्हणुन तक्रारदार यांचेकडे पंच नंबर 1 यांचेसमक्ष 25,000/- रु लाचेची मागणी करुन दिनांक 28/11/2025 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाईवेळी टेंभु उपसा सिंचन व यांत्रिकी व विद्युत पथक ओगलेवाडी कराड येथे तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष 25,000/- रुपये लाच स्विकारली आहे. म्हणून त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे अपराध केला आहे

तसेच यातील लोकसेवक माधुरी साई देवरे, वय 35 वर्षे, कनिष्ठ अभियंता, टेंभु उपसा सिंचन व यांत्रिकी व विद्युत पथक ओगलेवाडी कराड ता.कराड जि.सातारा रा फ्लॅट नं एफ 9 सिल्वर गार्डन अपार्टमेंट बनवडी फाटा कराड ता कराड जि सातारा यांनी दिनांक 19/11/2025 रोजीच्या पडताळणी कारवाईवळी तक्रारदार शंकर रास्कर यांचेकडे मंजुर झालेल्या बिलाचे काम केले म्हणुन पंच नंबर 1 यांचेमसक्ष 17,000/- रुपये लाचेची मागणी करुन तक्रारदार यांना साहेबांना भेटण्यास सांगीतले. दिनांक 28/11/2025 रोजीच्या सापळा कारवाईवेळी टेंभु उपसा सिंचन व यांत्रिकी व विद्युत पथक ओगलेवाडी कराड येथे तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष 17,000/- रुपये लाच रक्कम स्विकारुन त्यांनी बेकायदेशीर, अप्रामाणिकपणे आर्थिक गैरफायदा मिळविला म्हणून त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7, 12 प्रमाणे अपराध केला आहे. म्हणुन माझी दोघांचे विरोधात कायदेशीर फिर्याद आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** RAJU ANANDA TAHSILDAR (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** RAJU ANANDA TAHSILDAR

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PNMH50695

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्‌दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1974 | | - | | **चेचक:** क्र. |
| 2 | महिला | 1990 | | - | | **चेचक:** क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**